# - संविधान पुन्हा धोक्यात -

पतसंस्थांच्या माध्यमातून ठेवीदारांचे हित जोपासून, पतसंस्थांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार नवा कायदा अस्तित्वात आणू पाहत आहे. यामध्ये दोषी संचालकांना १० वर्षे निवडणुकीत उभे राहता येणार नाही तसेच ठेवीदारांच्या बुडीत ठेवी वसुल करण्यासाठी संचालकांची मालमत्ता जप्त करण्याची तरतुद या नवीन कायद्यात प्रस्तावित आहे असे सरकार म्हणते आहे.

परंतु मायबाप सरकारला भारताच्या संविधानाचा विसर पडलेला दिसतो. भारताच्या संविधानातील अनुच्छेद क्र. १४ मध्ये **''कायद्यापुढे समानता''** याबाबत कुठलीही तडजोड केली जाणार नाही, असे मत प्रदर्शित केलेले आहे. कोणत्याही व्यक्तीस **भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे संरक्षण नाकारता येणार नाही** असा शब्द प्रयोग संविधानामध्ये आहे. आणि अशा परिस्थितीत सहकार कायद्यातील तुरतुदी पतसंस्थांना वेगळ्या व इतर सहकारी संस्थांना वेगळ्या हे असंविधानीक काम महाराष्ट्र सरकार करू शकत नाही. किंबहुना असा कायदा करणे म्हणजे सरकारची वैचारिक दिवाळखोरी सिध्द करते.

कुठल्याही सहकारी संस्थेत अनियमितता झाली, भ्रष्टाचार झाला, तसेच उपविधी व सहकार कायद्याचे उल्लंघन झाले तर त्या सहकारी संस्थेतील संचालकांवर सहकार कायदा कलम ७८, ८३, ८८ इत्यादी कायद्याच्या तरतुदीनुसार शिक्षा करण्याची सोय आहे. आणि असे असताना सरकार **ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे** यांच्या सहकाराच्या संकल्पनेला तिलांजली देवून बेकायदेशीर मार्गाने कायदा बनविण्याच्या वल्गना करते हेच मुळात लोकशाहीची टिंगल टवाळी करण्याचा विषय आहे. जेव्हा सहकारी संस्था सभासदांचे हित जपण्यास असमर्थ ठरते, त्यावेळी सहकारी कायद्यातील अनेक तरतुदी उपलब्ध असताना व काही तरतुदी अपुऱ्या असतील तर त्यात सुधारणा करणे शक्य असताना पतसंस्थांना ऐरणीवर ठेवून पतसंस्थांची बदनामी करण्याचा बेजबाबदारीपुर्वक प्रयत्न हास्यास्पद आहे. राज्यात सरकारच्या म्हणण्याप्रमाणे केवळ ४६२ पतसंस्था अडचणीत आहेत. एकूण **१७,२७८ सहकारी पतसंस्थांपैकी ४६२ पतसंस्था** अडचणीत असणे म्हणजे **हे प्रमाण २.६७ टक्के आहे**. व या नागरी सहकारी पतसंस्थांमधून एक हजार कोटी रूपये सुध्दा सभासदांचे अडकलेले नाहीत. याउलट **राज्यातील १६९ सहकारी साखर कारखान्यांपैकी १५०** च्या वर सहकारी साखर कारखान्यांमध्ये सभासद शेतकऱ्यांच्या ठेवी अडचणीत आहेत. याशिवाय विविध वित्तीय संस्था व शासनाचे हजारो कोटी रूपये अडचणीत आले आहेत. अशा अडचणीत येणाऱ्या **सहकारी साखर कारखान्यांचे ८८.७५ टक्के प्रमाण आहे.** महाराष्ट्र राज्यात पतसंस्थांमधील वरील कारणास्तव १०४० संचालक मंडळ सदस्यांवर ३६० कोटी रुपयाची जबाबदारी निश्चित केली असे सरकार म्हणते. उलटपक्षी ज्या सहकारी साखर कारखान्यांनी सभासद शेतकरी ठेवीदारांचे, वित्तीय संस्थांचे व सरकारचे १८००० कोटी रुपये जवळ जवळ हडप केलेले आहेत, त्याबद्दल महाराष्ट्र सरकार नवीन कायद्याची भाषा बोलत नाही व कोणालाही जेलमध्ये टाकीत नाही आणि हे असे वर्तन भारताच्या संविधानाला खुल्लम खुल्ले आव्हान आहे.

जे साखर कारखाने २५ वर्षानंतर देखील करोडो रूपये संचीत तोट्यात आहेत, अशाच दिवाळखोर प्रवृत्तीच्या संचालकांच्या साखर कारखान्यांना मायबाप सरकार हजारो करोडो रुपये मदत सरकार, बँका व नाबार्डच्या माध्यमातून करते. परंतु पतसंस्थांच्या बाबतीत आतापर्यंत फक्त रु. ५२.७९ कोटी सरकारने पतसंस्था मधील ठेवी परत करणेसाठी, कर्जाऊ दिले आहे ही **अनैसर्गिक विषमता** महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेला काळींबा फासणारी आहे. यासाठी पुरोगामी महाराष्ट्र राज्यात मूलभूत संकल्पना देशात उज्ज्वल करण्यासाठी सहकारातील धुरीनांनी व जाणत्या कार्यकर्त्यांनी कायदा हातात घेणाऱ्यांच्या विरोधात हायकोर्ट तसेच सुप्रीम कोर्टाचे दरवाजे ठोठावले पाहिजेत. अन्यथा वेळ निघून गेल्यानंतर पतसंस्थांचे अस्तित्व टिकण्यासाठी व त्या समस्या दूर करण्यासाठी कार्यकर्ते लाचार

होतील व शेवटी कायदा हातात घेणारे शिरजोर होतील हे सांगण्यासाठीच या अग्रलेखात हा उहापोह केला आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**